REGISTERED No. B. 3434




# अर्थ

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख १२ आक्टोबर, १९४९ अंक ४१

श्री

दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट
लिमिटेड, पुणें २.

युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण
वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के
डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

## सोसायट्यांस विनंति

किर्लोस्कर कंपनी सोसायट्यांना ज्या भावांत माल देते त्याच भावांत आम्हीहि नांगर वगैरे माल पुरवितों. आपली कोणतीहि ऑर्डर आपण आमचे मार्फत पाठविण्यानें तोटा नसून फायदाच आहे. सर्व तऱ्हेची सोसायट्यांना लागणारी माहिती व इतरहि माल आम्ही पुरवितों.

**या वर्षीची ऑर्डर आमचे मार्फतच पाठवा.**

केळकर बंधु, पुणें व नाशिक.

## विविध माहिती

**सहकारी गृहसंस्थांबाबतच्या धोरणांत बदल**—सहकारी गृहसंस्थांना मदत देण्याच्या सरकारी धोरणांत थोडा बदल करण्यांत आला आहे. अशा संस्थेच्या एखाद्या सभासदाच्या मालकीचें घर अगर घर बांधण्यासारखी जमीन ग्रामीण भागांत असल्यास त्या सभासदाला त्याच जिल्ह्यांतील एखाद्या मोठ्या गांवीं दुसरें घर अगर जमीन संस्थेतर्फे घेतां येईल. मात्र आपणास अशा मदतीची गरज आहे ह्याविषयीं त्यानें सरकारचें समाधान केलें पाहिजे. सध्यांच्या नियमाप्रमाणें ग्रामीण भागांत घर अगर जमीन असणाऱ्यांना जिल्ह्यांतल्या मोठ्या गांवीं घर घेण्यास सरकारी मदत मिळत नसे.

**उंसाच्या लागवडीविषयीं प्रश्नपत्रिका**—मध्यवर्ती सरकारच्या शेतकी खात्याच्या टेक्निकल शुगरकेन कमिटीनें उंसाची लागवड करणाऱ्यांच्यासाठी एक प्रश्नपत्रिका काढली आहे. ह्या प्रश्नपत्रिकेंत उंसाच्या लागवडीचा खर्च आणि तद्संबंधीं इतर माहिती मागविली आहे. प्रश्नपत्रिकेचे दोन भाग आहेत. पैकीं पहिल्या भागांत उंसाच्या लागवडीखालील जमीन, उंसाची विल्हेवाट, लागवडीचा खर्च, भांडवली खर्च, इत्यादी बाबींची चौकशी करण्यांत आली आहे. दुसऱ्या भागांतील प्रश्न उंसाच्या संशोधनाचें काम करणाऱ्यांना उपयोगी पडतील अशा प्रकारचे आहेत.

**ब्रिटिश बोट-वहातुक आणि परकीय हुंडणावळ**—ब्रिटनच्या बोटींच्या वहातुकीच्या व्यवसायानें १९४७ सालीं ब्रिटनला ६,००,००,००० पौंड (८० कोटी रुपये) किंमतीची परकीय हुंडणावळ मिळवून दिली. १९४८ सालीं तर हें उत्पन्न अधिकच होईल असा अंदाज आहे. ह्या धंद्याबाबतची अशी चौकशी दर पांच वर्षांनीं करण्यांत येते. परंतु युद्धामुळें, १९३६ सालीं चौकशी झाल्यावर, ती आजच पुन्हां करण्यांत येत आहे.

**पाकिस्तानच्या रुपयाचें नांवही बदलणार ?**—पाकिस्ताननें आपल्या रुपयाचें अवमूल्यन न करण्याचें तर ठरविलें आहेच, परंतु रुपयाचें नांवही पाकिस्तान बदलणार असल्याची बातमी आहे. रुपयाचें नवीन नांव बहुधा 'चांद' असें ठेवण्यांत येईल. 'चांद' हा चंद्रासाठी उर्दू शब्द असून 'चांदी' ह्या उर्दू शब्दाचा लघुशब्द आहे.

**विलीन संस्थानांतील बँकांचे भाग**—दक्षिण महाराष्ट्रांतील विलीन झालेल्या संस्थानांच्या बँकांमध्यें संस्थानिकांचे भाग होते. संस्थानांचें विलीनीकरण झाल्यावर हे भाग मुंबई सरकारच्या मालकीचे झाले. हे भाग सरकारनें विक्रीला न काढतां आपल्याच नांवावर ठेवावे अशी विनंती संस्थानी बँकांतर्फे करण्यांत आली होती. बँकांच्या म्हणण्याचा सरकार विचार करील असें आश्वासन देण्यांत आलें आहे.

**अमेरिकनांची सरासरी आयुमर्यादा**—अमेरिकेंतील नागरिकांच्या आयुष्याची सरासरी अपेक्षा ६७ वर्षें आहे असें अधिकृतरीत्या जाहीर झालें आहे. गेल्या दहा वर्षांत आयुष्याची सरासरी अपेक्षा ३ वर्षांनीं वाढली आहे.

**पाकिस्तान रशिअन तज्ज्ञ आणणार ?**—कराची येथें सध्या रशिआचे व्यापारी प्रतिनिधी आणि पाकिस्तान ह्यांच्यांत व्यापारासंबंधीं वाटाघाटी चालू आहेत. रशिअन शेतकी-तज्ज्ञ आणि शेतकीचीं अवजारें आणण्याबाबत उभयता देशांत बोलणीं झालीं असें समजतें.

**हिंदुस्थानसाठी अमेरिकन रेल्वे एंजिनें**—भारतासाठी अमेरिकेंत तयार करण्यांत आलेलीं रेल्वे एंजिनें ब्रिटिश बोटींतून आणलीं जाणार आहेत. ह्या बोटींतून मुद्दाम रेल्वेचे रूळ टाकण्यांत आलेले आहेत. बोटींतून प्रत्येकीं ८८ टन वजनाचीं ३६ रेल्वे एंजिनें नेण्याची सोय केलेली आहे. प्रत्येक बोटीवर विजेवर चालणाऱ्या ३ यारया असून, त्या याऱ्या प्रत्येकीं १२० टन वजन उचलूं शकतात.

**रशिआसाठी अमेरिकन यंत्रें**—अमेरिकेच्या व्यापारखात्यानें रशिआला ५,००,००० डॉलर्स किंमतीची तेलाच्या कारखान्याची यांत्रिक सामुग्री देण्यास परवानगी दिली आहे. मार्च १९४८ पासून रशिआला युद्धांत उपयोग होईल अशा तऱ्हेचा माल पाठविण्यास अमेरिकन सरकारनें बंदी घातली होती. उलटपक्षीं रशिआकडून अमेरिकेला ४०,००० टन मॅंगेनीज आणि इतर युद्धोपयोगी खनिज निर्यात करण्यांत येत असल्याची बातमी आहे. ह्या देवाण-घेवाणीचा अर्थ उभय राष्ट्रांतील युद्धाचा धोका टळला असा करण्यांत येत आहे.

**संस्थानिक परदेशी पैसा गुंतवीत नाहींत**—भारतामधील कांहीं संस्थानिक आपला पैसा परदेशीं गुंतवीत आहेत अशा प्रकारच्या वार्ता मध्यंतरीं पसरल्या होत्या. परंतु सध्या हुंडणावळीच्या व्यवहारावर जीं नियंत्रणें आहेत, तीं लक्षांत घेतां सरकारला न कळवितां अशा तऱ्हेनें पैसा परदेशीं गुंतवितां येणें शक्य नाहीं असा खुलासा करण्यांत आला आहे.

**पौंडाची नवी किंमत आणि सिनेमा**—पौंडाची किंमत कमी करण्यांत आल्यामुळें अमेरिकेच्या चित्रपटाच्या धंद्याला २०,००,००० डॉलर्सला मुकावें लागलें आहे. हॉलिवुडमधील उत्पादकांचे ७,०,००,००० डॉलर्स इंग्लंडमधील बँकांमधून गोठविण्यांत आलेले होते. त्यांची किंमत आता ५०,००,००० डॉलर्सच होईल. ह्या शिवाय अमेरिकन चित्रपटांचें उत्पन्नही ३० टक्क्यांनीं घटेल.

**इंग्लंडच्या परिस्थितीचें निदान**—इंग्लंडचे भारतांतील हाय कमिशनर मि. आर्चिबाल्ड नाय हे एका भाषणांत म्हणाले, "ब्रिटन सध्या फार कठीण परिस्थितींतून जात आहे. तथापि, म्हणून निराश होण्याचें कारण नाहीं. कोणत्याही देशाचा मोठेपणा त्याचा विस्तार, लोकसंख्या अगर साधनसंपत्ती, ह्यांच्यावरून ठरवावयाचा नसून, त्यांतील जनतेच्या नैतिक बळावरून ठरवावयाचा असतो."

**चॉकोलेटच्या धंद्याला संरक्षण**—कोकोच्या पावडरच्या आणि चाकोलेटच्या धंद्याला ३१ मार्च १९५० नंतर संरक्षण देण्यासंबंधीं टॅरीफ बोर्डापुढें नुकतीच चर्चा झाली. पुण्याची मे. साठे बिस्किट अँड चॉकोलेट कंपनी, ह्या कंपनीनें चर्चेंत भाग घेतला होता. कोकोची पावडर आणि चाकोलेट ह्यांची आयात आतां खुल्या परवान्याप्रमाणें करण्यांत येत असल्यामुळें दोन्ही प्रकारचा माल खूप मोठ्या प्रमाणावर हिंदुस्थानांत आला आहे. त्यामुळें येथील धंद्यांचें नुकसान होत आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १२ आक्टोबर, १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


## आतां प्रत्यक्ष कृतीवर सर्व कांहीं अवलंबून !

भारत पार्लमेंटांत, रुपयाच्या मूल्य–घटीवर गेल्या आठवड्यांत चर्चा होऊन भारत सरकारनें रुपयाच्या हुंडणावळीची किंमत उतरविली त्यास पार्लमेंटानें मान्यता दिली. अर्थमंत्री, डॉ. मथाई, ह्यांनीं ह्या प्रश्नाची पार्श्वभूमि सांगतांना, ब्रिटिश सरकारनें पौंडाची किंमत उतरविण्यापूर्वी भारत सरकारशी त्याबाबत चर्चा केली नाहीं, इतकेंच नव्हे तर त्याचा निर्णयहि उशीरा कळविला अशी माहिती दिली. भारत सरकारास स्वतःचें धोरण ठरविण्यास त्यामुळें फारसा अवधि मिळाला नाहीं व रुपयाची किंमत पौंडाच्या मागोमाग उतरविणें क्रमप्राप्तच झालें हें खरें असलें, तरी ब्रिटिश सरकारनें भारत सरकारास कमी लेखण्यांत जी वृत्ति प्रकट केली तिच्याबद्दल नापसंती डॉ. मथाई ह्यांच्या भाषणांत स्पष्ट दिसून येत होती. पाकिस्तानानें त्याच्या रुपयाची किंमत पूर्वीइतकीच कायम ठविली आहे, त्याबद्दलहि पार्लमेंटांत संताप व्यक्त करण्यांत आला. परंतु, मुख्य प्रश्नाचा विचार करतांना, ह्या गोष्टींस अवास्तव महत्त्व देऊन भागणार नाहीं; ज्या कारणांचा तो परिणाम आहे, तीं कारणें दूर करण्याचा प्रयत्न करणेंच श्रेयस्कर ठरेल. भारताचें आंतरराष्ट्रीय किंवा कॉमनवेल्थमधील स्थान कित्येकांस वाटतें तितकें महत्त्वाचें नाहीं, हें आतां स्पष्ट झालें आहे. “ देशाचा विस्तार, त्याची लोकसंख्या किंवा साधनसंपत्ति ह्यांच्यावरून त्याचा मोठेपणा ठरवावयाचा नसून त्यांतील जनतेच्या नैतिक बलावरून तो ठरवावयाचा असतो ” असें इंग्लंडचे भारतांतील हाय कमिशनर एका भाषणांत नुकतेच म्हणाले. त्यांचे हे उद्गार इंग्लंडच्या परिस्थितीला अनुलक्षून होते; भारतांतील परिस्थितीसहि ते लावून पहावे व आत्मनिरीक्षण करावें, म्हणजे आपल्या आजच्या स्थानाची पुरी कल्पना येईल.

योजना कितीहि केल्या व त्या कितीहि चांगल्या असल्या तरी त्यांची अंमलबजावणी कार्यक्षमतेनें होण्यावरच त्यांचें यश अवलंबून असतें. कित्येक वेळां योजना शंभर टक्के चांगली नसली तरी ती कार्यक्षमतेनें पार पाडली तर फलप्राप्ति समाधानकारक होऊं शकते. भारत सरकारनें योजना आखून धोरणें जाहीर करण्याचे कामांत पुष्कळच यश मिळविलें आहे, परंतु त्यांची अंमलबजावणी मात्र फारच मंदगतीनें होत आहे. अर्थमंत्री, डॉ. मथाई, ह्यांनीं आपल्या भाषणांत ही गोष्ट प्रांजलपणें मान्य केली आहे. “ नवीन योजनांपेक्षा त्यांची अंमलबजावणी करण्याची तयारी, पात्रता व तत्परता ह्यांचीच आज भारतास जास्त जरूरी आहे ” असें त्यांनीं सांगितलें. “ भारताचे आर्थिक प्रश्न हे वस्तुतः केवळ तात्त्विक अर्थशास्त्राचे प्रश्न नाहींतच; ते सोडविण्यांतील कारभाराच्या ढिलाईमुळें ते तीव्रतर झाले आहेत. परिस्थितीची डोकेबाज लोकांनीं पहाणी करण्याची आतां फारशी जरूरी उरलेली नाहीं, मोठ्या योजनाहि आखण्याचें काम तूर्त नाहीं; चांगलें व मनापासून काम करून कार्यक्षमतेनें अंमलबजावणी करण्याकडे आपण लक्ष पुरविलें पाहिजे, ” असेंहि ते म्हणाले.

डॉ. मथाई ह्यांनींच योजनांपेक्षा प्रत्यक्ष कृतीच्या महत्त्वावर भर दिला, हें ठीकच झालें. त्यांनीं जाहीर केलेल्या अष्टसूत्री उपाय–योजनेकडे या दृष्टीनेंच पाहिलें पाहिजे. जीवनावश्यक जिनसांची किरकोळ विक्रीची किंमत दहा टक्क्यांनीं उतरविण्यासाठी प्रांतिक सरकारांच्या सहकार्यानें भारत सरकार प्रयत्न करणार आहे. हा प्रयत्न कार्यक्षमतेनें केला, तर रहाणीच्या खर्चाचें मान ३० ते ४० अंशांनीं उतरूं शकेल, बहुसंख्य लोकांना आज जमा–खर्चाची तोंडमिळवणी करतां येत नाहीं ती ते ती करूं लागतील आणि अशा रीतीनें जनतेंत आशामय वातावरण निर्माण होईल. परंतु, योजना व त्यांचें फळ ह्यांतील अंतर तुटलें गेलें पाहिजे ना ! ह्या वर्षी सरकारी खर्चांतील ४० कोटी रुपयांची संकल्पित काटकसर आणि त्याच्या किमान दुपटीइतकी पुढील वर्षांतील काटकसर, ह्यांसहि वरील गोष्ट लागू आहे. थोडक्यांत म्हणजे, सरकारी योजना प्रत्यक्ष कृतींत उतरूं लागेपर्यंत जनतेचा सुटूं लागलेला धीर आवरून धरणें कठीण जाणार आहे. इंग्लंडसारख्या देशांतील सरकारची कार्यक्षमता जशी जास्त, तशी तेथील आर्थिक व इतर व्यवहारांत सामाजिक जबाबदारीची जाणीवहि जास्त आहे. भारताला ह्या दोन्ही बाबतींत थोड्या अवधींत झपाट्यानें प्रगति करावयाची आहे. बिकट आर्थिक परिस्थितींतून बाहेर पडतांना दूरगामी हिताचे कार्यक्रम बाजूस ठेवावे लागणें अपरिहार्य झालें आहे. त्यामुळें तातडीच्या प्रश्नांकडे सर्व लक्ष व सामर्थ्य केंद्रित होणें, हें मात्र गृहीत आहे. सरकारी कारभाराच्या कार्यक्षमतेच्या कसोटीची ही वेळ आहे. सरकारी अधिकारी, नोकरवर्ग त्याचप्रमाणें जनता ह्यांनीं प्रस्तुत संकटकाळीं एकजुटीनें व ध्येयवादानें संघटित प्रयत्न केले तरच यशाची आशा आहे. देशविघातक कृत्यांस ह्यापुढें वाव रहाता कामा नये व नैतिक बलास त्याचा ताण सहन करावा लागता कामा नये.

### संस्थानांच्या विलीनीकरणामुळें मुंबई प्रांताच्या खर्चांत वाढ

एकूण ५५ मोठ्या व ३५४ छोट्या संस्थानांच्या विलीनीकरणामुळें मुंबई प्रांतास १ ऑगस्ट, १९४९ ते ३१ मार्च, १९५० ह्या आठ महिन्यांत १३,५५,००,००० रु. जादा खर्च येणार आहे. त्यांत संस्थानिकांचे व त्यांच्या नातेवाईकांचे तनखे ह्यांचाहि समावेश होतो. बडोदें व कोल्हापूर ह्यांच्या महाराजांस प्रत्येकीं वार्षिक २६,५०,००० रु. व ११,००,००० रु. तनखा आहे.

## दिवाळी अंक

“ अर्थ ” चा ह्यापुढील अंक ‘ दिवाळी अंक ’ असून त्यांत दरवर्षीप्रमाणें महत्त्वाच्या आर्थिक विषयांवर अनेक तज्ज्ञांचे लेख येणार आहेत. त्यानंतरचा अंक ९ नोव्हेंबर रोजीं प्रसिद्ध होईल.

## युरोपांत झेक राष्ट्राचा स्वस्त माल

युरोपच्या आर्थिक उत्कर्षाला पूर्व-युरोप आणि प. युरोप ह्यांच्या दरम्यान व्यापाराची वृद्धि व्हावयास पाहिजे, असें सांगण्यांत येत असतें. ह्या अपेक्षित व्यापारवृद्धीच्या मार्गांत निरनिराळ्या राजकीय रंगांचीं सरकारें हाच खरा अडथळा होय. तरी पण भूगोलदृष्ट्या एकमेकांचे शेजारीं असलेल्या राष्ट्रांना परस्परांमधील व्यापार अजिबात टाळता येत नाहीं. राजकीय दृष्ट्या भिन्न जातीचीं सरकारें व्यापाराचे मार्ग मात्र वेगवेगळे अवलंबितात. ज्या देशांत आर्थिक नियंत्रण संपूर्णपणें सरकार करतें, त्याला व्यापारांतील मामुली अडचणी आणि अर्थशास्त्राचे सामान्य नियम ह्यांना थोडी-बहुत मुरड घालता येते.

ह्या प्रकारचें एक उदाहरण झेकोस्लोव्हाकिआचें देतां येईल. पश्चिम युरोपांत झेकोस्लोव्हाकिआ आपला पक्का माल अत्यंत स्वस्त किंमतींत देत आहे. त्यामुळें पश्चिम युरोपांतील राष्ट्रांत बरीच खळबळ उडाली आहे. झेकोस्लोव्हाकिआंत तयार होणारी 'टाट्रस' नांवाची मोटार त्या देशांत २,५०,००० क्रॉउन्सला मिळते. तीच मोटार पाकिस्तानांत अगर हॉलंडमध्यें ३८,००० क्राऊन्सला विकण्यांत येते. पोलंडमध्यें हीच मोटार ९८,००० क्रॉऊन्सला विकण्यांत येते. ही किंमत जवळ जवळ मोटारीच्या उत्पादनाच्या किंमतीइतकी आहे असा अंदाज आहे. झेकोस्लोव्हाकिआंतील उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल घेण्यासाठी त्याला परदेशी हुंडणावळीची गरज आहे. म्हणून एक प्रकारची मदत देऊन परदेशी बाजारपेठांत माल घेण्यांत येत असावा. तथापि त्यांतही सुसंगति दिसत नाहीं. झेक राष्ट्राला आज पौंडाची अधिक गरज असतांना, फ्रान्समध्यें ब्रिटनपेक्षा कमी किंमतींत माल विकण्यांत येत आहे. झेक सरकारच्या ह्या धोरणामुळें पश्चिम युरोपांतील सरकारें त्या राष्ट्राला कच्चा माल पुरवावा किंवा नाहीं ह्याचा विचार करूं लागलीं आहेत असें समजतें.

झेक मालाच्या कमी किंमतीसंबंधानें इतकेंच म्हणतां येईल कीं, एखाद्या कारखान्याच्या मालाच्या उत्पादनाची किंमत, नियुक्त अर्थव्यवस्थेंत निर्णायक ठरत नाहीं. सर्व देशाच्या उत्पादनाच्या किंमती जमेस धरून कांहीं वस्तू स्वस्त किंमतीला देणें अशा प्रकारची अर्थव्यवस्था असणाऱ्या राष्ट्राला परवडूं शकेल.

## राष्ट्रीयीकरणाविरुद्ध कंपनीचा प्रचार

टेट अँड लाइल लि. नांवाची एक साखर तयार करणारी कंपनी इंग्लंडमध्यें आहे. साखरेच्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण तेथील सरकारच्या कार्यक्रमावर आहे. ह्या आक्रमणाविरुद्ध टेट कंपनीनें प्रारंभापासूनच प्रचार सुरू ठेवला आहे. राष्ट्रीयीकरणाच्या विरुद्ध प्रचाराची मोहीम करण्यासाठी कंपनीच्या बोर्डानें एक वजनदार कमिटी नेमली आहे. इंग्लंडमध्यें ज्या वेष्टनांतून घरीं साखर दिली जाते, अशा रोजच्या २० लक्ष पाकिटांवर, "आम्हाला टेट कंपनीच हवी; स्टेट (सरकारी) हस्तक्षेप नको" असें ठळक अक्षरांत छापलेलें असतें. उद्योगधंद्याच्या ह्या राजकीय हस्तक्षेपाविरुद्ध लोकांनीं तक्रार केली. सरकारी अन्नखात्यानें ह्या प्रकारचा प्रचार थांबविण्यास कंपनीला सांगितलें आहे. परंतु कंपनीनें त्यास नकार दिला आहे. "राजकारण धंद्यांत शिरतें तेव्हां आमचे कामगार, भागीदार व गिऱ्हाईक ह्यांचें हित आम्हीं नको का सांभाळायला? ज्यास्त किंमतीस खराब साखर, हाच राष्ट्रीयीकरणाचा परिणाम होणार ना?" असें कंपनीचें त्या तक्रारीस उत्तर आहे.

## सहकारी बँकांचा कारभार आणि भागीदारांचीं कर्तव्यें

(लेखकः—श्री. ल. का. कुलकर्णी, अहमदनगर)

ज्या तत्त्वावर सहकारी बँकांची स्थापना झाली आहे, त्या तत्त्वाचा संपूर्णपणें विसर पडत चालला आहे असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. सहकारी बँकांचा कारभार सहकारी तत्त्वानुसार चालतो हें म्हणणें कितपत सयुक्तिक वाटेल याविषयीं शंका वाटते. सहकारी बँकांचे भागीदार सुद्धां आपल्या कर्तव्याला पूर्णपणें विसरत चालले आहेत. उदाहरण घेऊन सांगावयाचेंच झालें तर एका सहकारी संस्थेचें सांगतां येईल. या संस्थेचे सुमारें पांच हजार सभासद आहेत. नुकत्याच झालेल्या निवडणुकींत पांच हजारांपैकीं निम्मे सभासद मतदान करण्यासाठीं गेले, आणि वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी अवघे पंचवीस सभासद देखील जमणें मुष्कील ठरलें. कांहीं सभासदांना घरीं किंवा दुकानीं जाऊन बोलावून आणावें लागलें. यावरून भागीदार आपल्या कर्तव्याला विसरत चालले आहेत असें म्हटलें तर गैरवाजवी ठरणार नाहीं. असें कां होतें, याची चिकित्सा करूं लागलों तर असें दिसून येईल कीं सहकारी बँकांचे सभासद सहकारी तत्त्वाला विसंगत असें वर्तन करूं लागले आहेत. स्वतःचा स्वार्थ साधण्याची वेळ ज्या ज्या वेळीं येते त्या त्या वेळीं सहकारी तत्त्वाची संपूर्णपणें अवहेलना केली जाते. हीं विधानें सर्वसाधारण केलेलीं आहेत. कोणत्याहि एका विशिष्ट सहकारी संस्थेच्या सभासदांविषयीं मी लिहीत नाहीं. सहकारी बँकांचा कारभार कोणत्या तऱ्हेनें, कोणत्या पद्धतीनें केला जातो, सभासद या नात्यानें आपले हक्क व कर्तव्यें काय आहेत, याविषयीं सभासदांना कांहींच कल्पना नसते. अर्थात याला कित्येक सभासद अपवाद असूं शकतील. ही परिस्थिती बदलली पाहिजे. सहकारी बँकांच्या भागीदारांनीं डायरेक्टरांच्या निवडणुकांच्या वेळेला व वार्षिक सर्वसाधारण सभेला जास्तीत जास्त संख्येनें हजर राहून आपल्या कर्तव्याची त्याचप्रमाणें आपल्या हक्कांची अंमलबजावणी केली पाहिजे. वर्षाला ६ कीं ६½ टक्के डिव्हिडंड मिळतें, जास्तीत जास्त डिव्हिडंड मिळेल कीं नाहीं, एवढीच स्वार्थी वृत्ति ठेवूं नये. अर्थात अधिकारवाणीनें लिहिण्याचा माझा अधिकार नाहीं. पण सर्वसाधारणपणें मी जें पहातो व ऐकतो त्यावरून माझी मनोभूमिका विशद करून सांगत आहे. "विना सहकार नाहीं उद्धार" अशा प्रकारच्या लांब लांब पाट्या आपण समारंभांच्या वेळीं लावतो. सहकारी बँकांच्या वतीनें "सहकार-दिन" साजरे केले जातात. पण प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र सहकाराचा अभाव आपल्या दृष्टोत्पत्तीस येतो. सहकारितेचा आश्रय करून दैनंदिन कार्यक्रम-आंखला तर प्रत्येक सहकारी बँक आदर्श सहकारी बँक म्हणून ओळखली जाईल यांत शंका नाहीं.

**पाकिस्तान आणि आंतरराष्ट्रीय चलननिधी**—पाकिस्तानचें सरकार आंतरराष्ट्रीय-चलननिधी आणि आंतरराष्ट्रीय पुनर्घटना बँक ह्यांच्या सभासदत्वासाठी लवकरच अर्ज करणार आहे असें समजतें. पौंडी-गटांतील इतर देशांप्रमाणें पाकिस्ताननें आपल्या चलनाचें अवमूल्यन केलेलें नाहीं; तरी त्यामुळें पाकिस्तानच्या, सभासदत्व मिळविण्याच्या हक्काला बाध येत नाहीं. सभासद होणाऱ्या राष्ट्राला फंडांत कांहीं प्रमाणांत सोनें आणि कांहीं प्रमाणांत आपलें चलन भरावें लागतें.

## व्यापारांतील खांचा खळगे.

(४)

लेः—वा. अ. तेंडोलकर,
मॅ. डायरेक्टर, दि हिंद एजन्सीज लि. कोल्हापूर.

### नोकरांची नेमणूक

जेथें व्यापार किंवा उद्योगधंदे हे एकट्याच्याच मालकीचे असतात व ते स्वतःच सांभाळण्या इतके लहान प्रमाणावर असतात, तोंपर्यंत नोकर लोकांच्या नेमणुकीचा किंवा त्यांच्यापासून सावध राहण्याचा प्रश्नच निर्माण होत नाहीं. परंतु धंदा जेव्हां कांहींशा मोठ्या प्रमाणावर करावयाचा असतो किंवा त्याचा व्याप वाढलेला असतो तेव्हां नोकर लोकांच्या नेमणुकीचा प्रश्न निर्माण होतोच! कुंपणानेंच शेत खाल्लें, अशांतील अनेक प्रकार व्यवहारांत नेहमींच आढळांत येतात. व्यापारहि त्यास अपवाद नाहीं. कामाच्यां सोयीसाठी म्हणून नेमलेला नोकरवर्ग हा जसा दगाफटका देणारा ठरतो, तसाच तो आपल्या अज्ञानानेंहि धंद्यास गोत्यांतहि आणतो. कसेंहि असो, या दोहोंचे परिणाम धंद्यावर मात्र सारखेच होतात.

### नोकरांबाबत खबरदारी

अनभिज्ञ व तरूण नोकर नेमावयाचा म्हणजे त्यास सर्व शिकविण्याची व त्याच्या बऱ्यावाईट कृत्याचे परिणाम सोसण्याची तयारी ठेवावी लागते, तर अनुभवी व वयस्क नोकरवर्ग नेमावयाचा म्हणजे त्याच्या पूर्व चरित्राची बारकाईनें चौकशी करूनच त्यास नेमावें लागतें. जो नोकरवर्ग सुरवातीसें अत्यंत कळकळीनें व आपुलकीनें काम करतो तो जितका विश्वासास पात्र ठरतो तितकाच तो दगाफटका करण्यांतहि तरबेज असतो. मोठमोठ्या कंपन्या किंवा व्यापारी यांना असा अनुभव विशेष असा येत नाहीं, कारण ते प्रत्येक नोकराकडून ठराविक प्रकारच्याच कामाची अपेक्षा करितात. तर या उलट दोनतीन नोकरांच्या सहकार्यानें जेथें व्यापारधंदा करावयाचा असतो तेथें नोकरवर्गावर सर्व प्रकारची कामें सोपवावीं लागतात व अशाच वेळीं नुकसान येण्याचा संभव अधिक असतो. याकाठी सर्व पैशांची देवघेव आपण करणें, स्वतःच्या सहीनें दिलेली पावतीच अधिकृत मानण्यास गिऱ्हाइकांस बजावणें, मालाच्या खरेदी किंवा विक्रीवर स्वतःची अखेरची देखरेख ठेवणें, वारंवार स्टॉक लिस्ट व माल यांची तपासणी करणें, सर्व दैनंदिन व्यवहार रेकॉर्डच्या सहाय्यानें करणें व त्याप्रमाणें वारंवार तपासणी करणें, उधारी बिलांत सांडसूट इत्यादी गोष्टी फक्त स्वतः करणें, वगैरे अनेक प्रकारची खबरदारी न घेतल्यास आपला धंदा केव्हां संकटांत येईल हें सांगता येत नाहीं.

### व्यापारी भूमिका व जागरूकपणा

याहीपेक्षां महत्त्वाच्या दोन गोष्टी, नवीन व्यापाऱ्यानें सतत नजरेसमोर ठेवाव्या लागतात. त्या म्हणजे आपणांशी कोणीहि व्यापार करण्यासाठी येऊंद्या (मग तो मित्र, जवळचा आप्त किंवा कोणीही असो) त्याजबरोबर अशा वेळीं शुद्ध व्यापारी भूमिकेवरून वागण्याची आवश्यकता व दुसरी महत्त्वाची म्हणजे "दुसरा आपणांस फसविणार आहे" अशा भूमिकेवरून आपली सतत ठेवावयाची वागणूक! आपले आप्त किंवा मित्र असल्यास त्याचेपासून होणारा फायदा फारतर त्यांना इतर कांहीं कारणावरून परत करावा, परंतु व्यापारी धोरणाला कोणत्याही प्रकारें बाध न येईल अशीच सतत खबरदारी घेतली पाहिजे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण प्रत्येक व्यक्तीचा किंवा संस्थेचा बरा-वाईट अनुभव घेऊन शहाणे होण्यापेक्षां, कोणतीहि व्यक्ती किंवा संस्था आपणांस कोणत्याहि प्रकारें नुकसानींत किंवा संकटांत न आणील अशी खबरदारी नेहमीच घेणें हितावें ठरलें. सर्वांचाच अनुभव घ्यावयाचा म्हटल्यास आयुष्य व पैसा दोन्हींहि अपुरे पडतील.

व्यापार किंवा उद्योगधंद्यांतील यश हें झटपट मिळणारें किंवा तसें तें (युद्धकाळांतील यशाप्रमाणें) मिळाल्यास दीर्घकाळ टिकणारें यश नव्हे. त्यांत दीर्घकाल टिकाव धरून टक्केटोणपे खात मिळणारें यशच अधिक लाभदायक असतें. अनुभवानें शहाणपणा शिकतां येतो, सुधारणा करतां येतात, नुकसान आलें असल्यास भरपाई होते, पण यासाठीं प्रतिकूल परिस्थितींतहि टिकाव धरून नेटानें धंदा सुरू ठेविला पाहिजे.

व्यापार किंवा उद्योगधंदा कोणत्याहि प्रकारचा असो, त्यांत यश हें आहेच! मात्र तें मिळविण्याची आपली तयारी पाहिजे. बुडी मारून समुद्राच्या तळाशी गेल्याखेरीज ज्याप्रमाणें हाताला मोत्याची शिंपली लागत नाहींत, त्याप्रमाणेंच व्यापार-उद्योगधंद्यांतहि तन्मय होऊन टिकाव धरल्याखेरीज यश हातीं येत नाहीं. प्रतिकूल परिस्थितीशी जो टक्कर देतो त्यासच यशाचा मार्ग सांपडतो! व्यापारहि ह्यास अपवाद नाहीं.

(समाप्त)

## मृत्युपत्राच्या प्रोबेटवर कोर्टफीची आकारणी.

### मुदतीबाहेरील कर्जे वजा घालतां येईल!

#### मुंबई हायकोर्टाचा महत्त्वाचा निर्णय.

एखाद्या मयत इसमाच्या मृत्युपत्राचे प्रोबेट घेतांना त्यासाठी कर्जें वजा जातां उरणारी मयताची जी मिळकत असेल तिच्या किंमतीवर कोर्टफी भरावी लागते. कोर्टफीसाठी मयताच्या मिळकतीची किंमत ठरवितांना मयताची मुदतीबाहेर गेलेलीं कर्जें वजा घालतां येतील काय? अशा महत्त्वाच्या प्रश्नावर मुंबई हायकोर्टानें नुकताच आपला निर्णय दिला आहे. मयत नरसीदास जयकिसनदास ह्यांनीं सर हिरालाल गोसालिया ह्यांना आपल्या मृत्युपत्राचे व्यवस्थापक (एक्झिक्युटर) नेमलें होतें. त्यांनीं प्रोबेटचा अर्ज करतांना ७२,६९५ रु. व १,८८० रु. ह्या सुमाराच्या दोन मुदतीबाहेर गेलेल्या कर्जांच्या रकमा मिळकतीच्या किंमतींतून वजा घालून उरलेल्या रकमेवर कोर्टफी भरली होती. तेव्हां अशाप्रकारें मुदतीबाहेर गेलेलीं कर्जें वजा करता येतील काय? असा प्रश्न कोर्टापुढें उपस्थित झाला. मुंबई हायकोर्टाचे सर न्यायाधीश श्री. छगला व न्यायमूर्ति श्री. गजेंद्रगडकर ह्यांनीं ह्या प्रश्नाचा निर्णय दिला आहे. "कोर्टफीच्या कायद्याचे ह्या मुद्यावरील शब्द हे सावकाराच्या दृष्टीनें नव्हे तर व्यवस्थापकाचे दृष्टीनें विचारांत घेतले पाहिजेत. कायद्यामध्यें जी शब्दयोजना आहे, तिच्यामध्यें 'कायद्यानुसार देण्यास योग्य' (पेएबल ॲट लॉ) असे शब्द आहेत; 'कायद्यानुसार वसूल करण्यायोग्य' (रिकव्हरेबल ॲट लॉ) असे शब्द नाहींत. मुदतीच्या कायद्यानें कर्ज रद्द होत नाहीं; तें वसूल करण्यासाठी दावा लावण्याचा हक्क नाहींसा होतो. शिवाय 'इंडियन सक्सेशन ॲक्ट' प्रमाणें व्यवस्थापकास माहित असलेली मयताची कोणतीहि कर्जें त्यास फेडतां येतात. मुदतीबाहेर गेलेलें कर्जहि तो परत देऊं शकतो व त्याप्रकारचे कराराहि करूं शकतो" असें मत नमूद करून प्रोबेटसाठी मिळकतीची किंमत ठरवितांना मुदतीबाहेर गेलेलीं कर्जेंहि वजा घालता येतील व उरलेल्या रकमेवर कोर्टफी भरतां येईल असा स्पष्ट निर्णय मुंबई हायकोर्टानें दिला आहे.

स. वा. दातार

## सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनीचें यश

### व्यापापेक्षा काटकसरी व दूरदृष्टीच्या व्यवस्थेस महत्त्व

वरील कंपनीचा पांचव्या वर्षाचा अहवाल पहिल्या मूल्यमापनाच्या अहवालासह आमचे हातीं नुकताच परीक्षणार्थ आला आहे. अहवालाचे सालीं, कंपनीनें ५,०३,१९५ रु. चे एकूण २४३ विमे दिले, व पहिल्या वर्षीच्या व प्रतिवर्षीच्या हप्त्याचे म्हणून एकूण ९९,१९२ रु. जमा केले. या पैकीं फक्त २५,२६७ रु. इतकी रक्कम, व्यवस्था खर्चासाठीं लागली. रिन्युअल खर्चाचें हें प्रमाण अवघें १२·१७ टक्के पडतें. कंपनीच्या या प्रारंभीच्या काळांत, चोहोंकडून महागाईची तीव्र झळ भासत असतांना सुद्धां, खर्चाचें प्रमाण येवढें कमी आणून ठेवण्यांत कंपनीनें मोठेंच चातुर्य व दूरदर्शीपणा दाखविला आहे यांत शंका नाहीं. कंपनीनें आपल्या लाईफ फंडांत या वर्षी सुमारें ७२ हजारांची भर घातली असून, आतां एकूण लाईफ फंड २,६८,९४३ रु. इतका झाला आहे. यापैकीं २,०५,१४३ रु. इतकी रक्कम सरकारी रोख्यांत गुंतविली गेली असून, बाकीची, मुंबई म्युनिसिपल लोन, स्थावर मिळकती, विमा पॉलीसीज वगैरेवर दिलेलें कर्ज यांत गुंतवण्यांत आली आहे. कंपनीनें मुख्यतः आपल्या विमेदारांकरितां पुण्यास, डेक्कन कॉलेजसमोर भलीमोठी हवेशीर जागा खरीदली असून तेथें कॉलनीची एक योजना आंखली जात आहे. कंपनीच्या पहिल्याच पंचवार्षिक मूल्यमापनाच्या संक्षिप्त सपालोचनावरून बरीच उद्बोधक माहिती मिळते. कंपनीस गेल्या पांच वर्षात मिळालेला सरासरी व्याजाचा दर, प्राप्तीवरील कर वजा जातां, तीन टक्क्यांहून अधिक आहे. यापुढेंहि तो कमींतकमी इतका तरी मिळेल असें समजून २½ टक्क्यानें मूल्यमापन करण्यांत आलें आहे. तसेंच, रिन्युअल खर्चाचें पांच वर्षांचें सरासरी प्रमाण १२·१७ इतकें असूनसुद्धां पुढील खर्चासाठीं १६ टक्क्यापर्यंत तरतूद करून ठेवण्यांत आली आहे. सर्व बाजूंनीं इतका काटेकोरपणा करून सुद्धां, कंपनीस या मूल्यमापनांत पांच हजारांचेवर नफा झाला आहे. या नफ्यापैकीं ३,००० रु. रिझर्व फंडांत जमा करून ५०७ रुपये पुढील मूल्यमापनांत द्यावयाचे आहेत. व उरलेले १,८५० रु. मूल्यमापनाच्या तारखेस ज्या पॉलीसीजना तीन वर्षे पूर्ण होत आहेत अशा पॉलीसीजना दरसाल दरहजारीं ३ रु. याप्रमाणें बोनस द्यावें असें जाहीर करण्यांत आलें आहे. याशिवाय दरसाल दरहजारीं २ रु. प्रमाणें, इंटेरीम बोनस देण्याचीहि मूल्यमापनाचे रिपोर्टांत तरतूद करून ठेविली आहे.

कंपनीनें पहिल्याच व त्याहि अत्यंत काटेकोर मूल्यमापनांत, विमेदारांना बोनस देण्याइतका फायदा दाखविला ह्यावरून चालकांचें व्यवस्थाचातुर्य व दक्षता हीं दिसून येतात.

पहिल्याच मूल्यमापनांत बोनस वाटणारी ही पहिलीच म्युच्युअल विमा कंपनी आहे हें प्रामुख्यानें नजरेस आणून देणें जरूर आहे. कंपनीचा धंदा व व्याप जरी थोडा असला, तरी तोच धंदा काटकसरीनें व सावधपणानें केला तर हल्लीच्या मंदीच्या दिवसांत सुद्धां कंपनीला विमेदारांचा भरपूर फायदा करून देतां येतो. याचाच अर्थ कंपनीचें यश, तिनें मिळविलेल्या कामाच्या फुगीर आंकड्यांवर किंवा तिनें वाढविलेल्या मोठ्या पसाऱ्यावरच केवळ नसून, नवीन काम चांगल्या प्रतीचें व कमी खर्चांत घेणें व धंदा काटकसरीनें व दूर-दृष्टी ठेवून करणें यांतच कसें आहे हें सेंट्रल म्युच्युअलनें दाखवून दिलें आहे. अशा प्रकारच्या व्यवस्थेस उत्तरोत्तर अधिक यश मिळेल, ह्यांत संशय नाहीं.

---

## बँक मॅनेजरची बडतर्फी कायदेशीर

### मुंबई हायकोर्टानें दावा खर्चासह काढून टाकला

मुंबई हायकोर्टाचे व फेडरल कोर्ट ऑफ इंडियाचे एक ॲडव्होकेट, श्री. अंबालाल पी. परीख ह्यांनीं हिंद बँक लि. वर ५०,००० रुपये नुकसानभरपाईचा दावा मुंबई हायकोर्टांत लावला होता. बँकेच्या मॅनेजरच्या जागेवरून त्यांना बेकायदा काढण्यांत आलें, असें त्यांचें म्हणणें होतें. बँकेच्या मॅनेजरच्या जागेसाठीं अर्ज मागविले. त्याप्रमाणें वादीनें अर्ज केला. वादी व बँकेचे चेअरमन श्री. गोएंका ह्यांचेमध्यें वाटाघाटी होऊन अखेर १ मार्च, १९४४ च्या पत्रानें श्री. परीख ह्यांस बँकेच्या मुंबई शाखेचे मॅनेजर म्हणून दरमहा १,००० रुपये पगारावर नेमण्यांत आलें. वादीचें म्हणणें, नोकरी कायम स्वरूपाची होती. ३० नोव्हेंबर, १९४४ अखेर त्यांनीं मॅनेजर म्हणून काम केलें. नोव्हेंबर अखेर पगार व आणखी एका महिन्याचा नोटीसबदला पगार त्यांना बँकेनें देऊन त्यांना कामावरून काढलें. दिलेली नोटीस अपुरी होती आणि आपल्याला बेकायदा रीतीनें काढण्यांत आलें असें श्री. परीख ह्यांचें म्हणणें. वादीची नेमणूक कायम स्वरूपाची होती, हें बँकेनें अमान्य केलें. चेअरमनला किंवा सर बद्रिनाथ गोएंका ह्यांना वादीस कायम नोकरीवर नेमण्याचा बँकेतर्फे अधिकारच नव्हता, असें बँकेनें सांगितलें. वादी हा कामांत कार्यक्षम नव्हता व त्याचीं कामें तो नीट करीत नसे, असें बँकेच्या अध्यक्षांनीं कोर्टास सांगितलें.

वादीची नेमणूक कायम स्वरूपाची नव्हती, हें मुंबई हायकोर्टानें मान्य केलें. वादीनें आपल्या पूर्वीच्या बँकिंग अनुभवाविषयीं केलेलीं विधानें निराधार असल्याचें हायकोर्टानें नमूद केलें. तज्ज्ञ कामगार, कारागिर, कलावान किंवा इतर ह्यांची नोकर म्हणून नेमणूक केली, तर त्या त्या कामास त्यांची लायकी आहे, अशी हमी गृहीत धरली जाते. अशा परिस्थितींत वादीस कामावरून काढण्याचा बँकेचा हक्क निरपवाद आहे आणि वादीस पुरेशी नोटीस मिळाली म्हणजे झालें. प्रस्तुत प्रकरणीं वादीस पुरेशी नोटीस मिळाली असल्याचें हायकोर्टास आढळून आलें.

---

### दांडेकर कामगार सोसायटी.

दि दांडेकर वर्क्स एम्प्लॉइज को-आपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. या संस्थेची नववी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक २८-९-४९ रोजीं सायंकाळीं पांच वाजतां दांडेकर कारखान्याच्या कार्यालयांतील सभागृहांत कारखान्याच्या संचालक मंडळापैकीं अेक सदस्य आणि गांवांतील सुप्रतिष्ठित नागरिक श्री. भाऊसाहेब कर्वे बी. ए., यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती, अहवालाच्या सालांत सोसायटीला एकूण रु. १७३२-१२-६ इतका निव्वळ नफा मिळाला आणि सभासदांना शेकडा ५½ नफा वाटण्याचें ठरलें. सोसायटीचें अेकूण भाग भांडवल रु. २०,८६३ अेवढें झालें आहे. पुढील सालाकरतां अध्यक्ष श्री. गो. ग. दांडेकर, उपाध्यक्ष श्री. व. वि. देवघर आणि ऑनररी सेक्रेटरी म्हणून श्री. सिताराम बाळू सांडवेकर यांची निवड झाली.

---

### दि अर्बन को. बँक लि., इस्लामपूर

अहवालाचे वर्षात बँकेची सर्वांगीण प्रगति झाली आहे. शेतीच्या मालाच्या तेजीमुळें माल तारण व्यवहार वाढत आहे. खेळतें भांडवल आतां १,३०,९४२ रु. झालें असून गेल्या वर्षातील उलाढालींचा आकडा २१ लक्ष, ७४ हजारांवर गेला आहे. बँकेस ३,००७ रु. निव्वळ नफा झाला. त्यांतून वेगवेगळ्या फंडांकडे रकमा वर्ग करून ३% डिव्हिडंड देण्यांत आलें. (चेअरमनः श्री. गो. ल. फडणीस, बी. ए., एलएल. बी., सेक्रेटरीः श्री. के. डी. बोरकर)

**ताजमहाल हॉटेलाच्या नोकरवर्गांत कपात**—मुंबई सरकारच्या दारूबंदीच्या धोरणामुळें ताजमहाल हॉटेलमधील ७५ नोकरांना चालकांनीं नोकरीवरून कमी केल्याच्या नोटिसा दिल्या आहेत. येत्या जानेवारींत संपूर्ण दारूबंदी झाल्यावर आणखीही नोकर कमी करण्यांत येण्याचा संभव आहे. अशीच आपत्ति पाश्चात्य धर्तीच्या इतर हॉटेलमधील नोकरांवरही येण्याची शक्यता आहे.

**कराची–लंडन हुंडणावळीचे दर**—पाकिस्तानची स्टेट बँक रुपये विकत असेल तेव्हां दर रुपयाचा भाव २ शिलिंग १ ३३/६४ पेन्स, आणि विकत घेत असेल तेव्हां २ शिलिंग २ १/६४ पेन्स, असे भाव ठरविण्यांत आले आहेत.

**जर्मनी–भारत ह्यांच्यामधील व्यापार**—भारत सरकारनें व्यापारी लोकांच्या सोईसाठीं म्हणून पश्चिम जर्मनीशीं करतां येण्यासारख्या देवाण-घेवाणीविषयीं माहिती देणारें एक लहानसें पुस्तक काढलें आहे. जर्मनीशीं असलेला युद्धपूर्व व्यापार, १९५० जून अखेर जर्मनीशीं करण्यांत आलेला व्यापारी करार, भांडवली माल मिळण्याची शक्यता, इत्यादी बाबींसंबंधीं पुस्तकांत माहिती पुरविलेली आहे.

**बँकांचे व इतर संस्थांचे अहवाल–संपादकीय खुलासा**

कित्येक बँकांच्या व इतर सहकारी संस्थांच्या अहवालांवर "अर्था"चा अभिप्राय देणें जागेचे अभावीं आम्हांस अद्याप शक्य झालेलें नाहीं. दिवाळी अंकानंतर हे अभिप्राय प्रसिद्ध करणें सोईचें होईल. ह्या विलंबाबद्दल आम्हांस दिलगिरी वाटते. —संपादक.

**पोस्टांतील ठेवींत घट**

१९४९ च्या पहिल्या पांच महिन्यांत संयुक्त प्रांतांतील पोस्टांतील पैशाच्या ठेवी कमी झाल्याचें आढळून आलें आहे. जानेवारी ते मे १९४९ ह्या महिन्यांत प्रांतांतील पोस्टांतील सेव्हिंग्ज बँक खात्यांतील ठेवींत ९४,६६,७८८ रुपये होते. १९४८ सालीं ह्याच काळांत ९९,२९,२६५ रुपयांच्या ठेवी होत्या.

**गुरांच्या संवर्धनाचें केंद्र**

हिंद सरकारनें दोन वर्षांपूर्वी जबलपूर येथें चांगल्या जातीच्या गुरांची पैदास करण्यासाठीं एक केंद्र उघडलें होतें. परंतु पैशाच्या अभावीं सरकारनें बचत करण्याचें धोरण स्वीकारल्यामुळें हें केंद्र तात्पुरतें बंद करण्यांत आलें आहे. ह्या केंद्रासाठी ३० लाख रुपये खर्च येणार आहे.

**सहकारी चर्चा मंडळ, पुणें**

वरील मंडळाची पहिली वार्षिक साधारण सभा शनिवार, ता. ८ रोजीं मंडळाचे अध्यक्ष, श्री. रा. य. बोरकर, ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. पुढील वर्षाकरितां सभेनें श्री. मो. ना. पाटसकर व श्री. एस. एल. ओगले ह्यांची अनुक्रमें अध्यक्ष व उपाध्यक्ष ह्या जागीं निवडणूक केली. श्री. ना. द. द्रवीड, श्री. रा. द. भट, व श्री. वि. ना. दात्ये, हे तिघे चिटणीसांचे जागीं निवडून आले. मंडळाचा पहिला वाढदिवस २९ सप्टेंबर रोजीं अर्थमंत्री श्री. वैकुंठराय मेहता ह्यांच्या अध्यक्षतेखालीं अगोदरच साजरा झाला होता.

दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल
बँक लि.
( शिड्यूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

अधिकृत, विक्रीस काढलेलें
व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,१५,१६५
खेळतें भांडवल रु. ७१,००,०००

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १
श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. द्रा. ग. बापट, उपाध्यक्ष.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
श्री. गो. धों. जोगळेकर श्री. सी. टी. चितळे
बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजिंग डायरेक्टर.
मॅनेजर.

दि मोटार ओनर्स म्युच्युअल
इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)
पुणें शाखाः—९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.
मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारीचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.— ब्रँच सेक्रेटरी

उंची कपड्याचा व स्नानाचा
उत्तम साबण
निर्मल सोप
दि माणिक सोप वर्क्स, कराड (सातारा.)

तयार कपड्यांचे व्यापारी
महिंद्रकर ब्रदर्स
बुधवार चौक, पुणें

## मिठाच्या धंद्यापुढील कांहीं प्रश्न

( भा. म. काळे. )

१९४७ सालीं मिठावरील कर रद्द करण्यांत आला त्यावेळीं मीठ स्वस्त होईल अशी अपेक्षा होती. परंतु किंमत उतरली नाहीं तर उलट मीठ थोडेंसें महाग होत गेलें. याचीं कारणें म्हणजे चलनविस्तारामुळें निर्माण झालेली परिस्थिति, वहातुकीचा अपुरेपणा व स्थानिक दृष्ट्या कांहीं ठिकाणीं दिसून येणारा अपुरा पुरवठा हीं होत. राज्यघटनेमध्येंहि मिठावर यापुढें कर कधींच बसविण्यांत येणार नाहीं अशी तरतूद करण्यांत आलेली नाहीं. सध्यांचें सरकार मिठावर कर बसविणार नाहीं, परंतु पुढें बजेटची तोंडमिळवणी करण्यास नवीन कर बसवावे लागल्यास मिठावर कर बसविला जाणें अशक्य नाहीं.

सध्यां हिंदमध्यें दर माणशीं दरवर्षी १३ पौंड मीठ खपतें. म्हणजे हा खप अपुरा आहे असें म्हणतां येत नाहीं. परंतु औद्योगिक कार्यासाठी मिठाचा उपयोग यापुढें जास्त प्रमाणांत करतां येणें शक्य आहे. रासायनिक द्रव्यें, खतें व मासे टिकविणें याबाबतींत मीठ जास्त प्रमाणांत उपयोगांत आणणें शक्य आहे. तेव्हां सध्यांचें देशांतील उत्पादन २५ टक्क्यांनीं वाढविल्यास ही वाढती मागणी पुरी करतां येईल. परंतु सध्यां देशांत दर वर्षी एक कोटी मण मिठाची आयात होते. १९४६, १९४७ व १९४८ सालचे मिठाच्या उत्पादनाचे प्रत्यक्ष आंकडे ४८० लक्ष मण, ५१५ लक्ष मण व ६३५ लक्ष मण ह्याप्रमाणें आहेत. गेल्या तीन वर्षांत उत्पादन वाढत आहे त्याप्रमाणांत वाढत गेल्यास लौकरच मिठाचें उत्पादन ८०० लक्ष मणांपर्यंत पोंचूं शकेल. पश्चिम बंगाल व ओरिसा ह्या किनाऱ्यांलगत मिठाचें उत्पादन वाढवयास १४ हजार एकरांचें क्षेत्र आहे. तेव्हां प्रांतिक सरकारें व खाजगी कारखानदार यांनीं या गोष्टीकडे लक्ष दिलें पाहिजे.

मिठाचे बाबतींत मालाचा दर्जा वाढविणें व उत्पादनाचा खर्च कमी करणें ह्या गोष्टींवर भर देणें आवश्यक आहे. मीठ तयार करण्याच्या बाबतींत एखाद्या मध्यवर्ती संस्थेमार्फत दिग्दर्शन होणें आवश्यक आहे. मालाची निपज व दर्जा यांत सुधारणा झाली पाहिजे. मालाचा दर्जा एकदां निश्चित झाला म्हणजे मोठाल्या उत्पादनाच्या केंद्रांत त्याची अंमलबजावणी करणें सोपें जाईल. एकंदर उत्पादनांपैकीं फक्त दोन टक्के उत्पादन लहान प्रमाणांत केलें जातें, व अशा प्रकारच्या मिठाचा दर्जा अगदीं कमी प्रतीचा असतो अशी तक्रार आहे. सांभर व खाराघोडा येथील मिठाच्या उत्पादनांत यांत्रिक शक्तीचा उपयोग करण्याचा विचार चालू आहे. गेल्या तीन वर्षांत मिठाचें उत्पन्न वाढण्याचें एक कारण मिठाच्या दरांत झालेली वाढ हें होय. कारण किंमत जास्त येत असल्यानुळें उत्पादन वाढविण्याकडे प्रवृत्ति दिसते. हिंदमध्यें गुरांची संख्या फार मोठी आहे व गुरांच्या खाण्यांत मिठाचा उपयोग करतां येणें शक्य आहे.

मिठाच्या बाबतींत उत्पादन कोठें व कसें वाढवितां येईल, कारखान्यांत यंत्रशक्तीचा उपयोग कसा करतां येईल, मिठाचा दर्जा कसा सुधारावा, मिठाचा औद्योगिक व इतर कामांसाठी जास्त उपयोग कसा करतां येईल याबद्दल सूचना करण्यासाठी एक तज्ज्ञांची कमिटी सरकारनें गेल्या वर्षी नेमली आहे. व तिचा अहवाल लौकरच प्रसिद्ध होईल.

---

बेडेकर मसाले वापरा

दि सेन्ट्रल म्युच्युअल
विमा कंपनी, लिमिटेड
हेड ऑफिसः—लालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.
★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे.
आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.
शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर.

खून साफ करनेमें मशहूर
डॉ. वामन गोपाल
का सार्सापरिला

बँक ऑफ पूना, लिमिटेड.
( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १२,५०,००० |

मध्यम वर्गीयांना मासिक उत्पन्नांतून एका रकमेनें मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागवत नाहीं. दरमहा ५ रु. नियमित शिल्लक टाकल्यास पांच वर्षांत ३०० रुपये स्वतःचे होतात. अशा बचत योजनेच्या रकमेवर ३ टक्क्यापर्यंत व्याज मिळण्याची सोय.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
जास्त माहितीसाठी मुख्य कचेरीस अगर शाखांस लिहा.
मुख्य कचेरीः—४५५ रविवार पेठ, पुणें नं. २
स्थानिक शाखाः—( १ ) भवानी पेठ. ( २ ) सदाशिव पेठ.
बाहेरगांवच्या शाखाः— (१) टिळक चौक, सोलापूर, (२) वखार भाग, सांगली.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.